# सुरक्षेची हमी देणारे महायुतीचेच सरकार सत्तेवर येणार

## माजी खा. डॉ. सत्यपाल सिंह यांचा विश्वास

**मुंबई, दि. ५ : प्रतिनिधी**

'सर्वांची साथ, सर्वांचा विश्वास आणि सर्वांचा विकास' या ब्रीद वाक्याचे पालन करणाऱ्या केंद्र आणि राज्यांमधील भाजपप्रणित सरकारांनी समाज आणि राष्ट्राला सुरक्षा दिली आहे. त्यामुळे येत्या निवडणुकीत महायुती सरकारलाच मतदार निवडून देणार, असा विश्वास भाजपचे माजी खा. आणि मुंबईचे माजी पोलीस आयुक्त डॉ. सत्यपाल सिंह यांनी मंगळवार, दि. ५ नोव्हेंबर रोजी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

यावेळी प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, भाजप प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आणि प्रवक्ते ओमप्रकाश चौहान उपस्थित होते. सत्यपाल सिंह यांनी सांगितले की, ''भाजपप्रणित सरकारच्या गेल्या साडेदहा वर्षांच्या कार्यकाळात जम्मू-काश्मीर मधील घटना वगळता देशात कोठेही बॉम्बस्फोटांच्या घटना घडल्या नाहीत. नक्षलवाद ८० टक्के आटोक्यात आला. कठोर कारवाई करण्यात आल्याने गुन्हेगारी आटोक्यात आली. हेच महाराष्ट्रात झाले. पोलीस दल सक्षम करण्यासाठी २० हजार पोलीस कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आली. आठ हजार जणांना प्रशिक्षण देण्यात आले. न्याय वैद्यक (फॉरेन्सिक) प्रयोगशाळांची संख्या वाढवण्यात आली. जलदगती न्यायालयांची संख्याही वाढली. सायबर गुन्हे रोखण्यासाठी ८५० कोटींचे केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. या सगळ्याचा परिणाम म्हणजे गेल्या दोन वर्षांत आलेल्या विदेशी गुंतवणुकीत महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. देशातील एकूण गुंतवणुकीच्या ५८ टक्के गुंतवणूक फक्त महाराष्ट्रात आहे. त्यामुळे येथील जनता सुरक्षा, समृद्धी देणारे भाजप महायुतीचे सरकार निवडून आणेल.''



### मोदींनी तिरंग्याचा सन्मान वाढवला

- ''नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यापासून कुठेही भूकबळी गेले नाहीत. ८० कोटी जनतेला त्यांनी मोफत अन्न पुरवले. गरिबांना मोफत घरे दिली. 'लाडकी बहीण योजना' सुरू केली. मागास समाजाला प्रगतीची दारे उघड करण्यासाठी 'आर्थिक महामंडळां'ची स्थापना, गॅस जोडणी, कागदपत्रांवर महिलांच्या नावांची नोंद करण्याला प्राधान्य दिले. देशातील कोणताही समुदाय असा नाही की, त्याला भाजपने राजकारणात पुढे आणले नाही,'' असे सत्यपाल सिंह यांनी नमूद केले.
- युक्रेन युद्धामध्ये अडकलेल्या विद्यार्थ्यांची भारताने यशस्वीरित्या सुटका करण्यात आली. एकूणच भारताने घेतलेल्या परराष्ट्रविषयक धोरणामुळे जगभरात भारतीय पासपोर्ट आणि तिरंग्याचा सन्मान वाढला, याकडे त्यांनी लक्ष वेधले.
- या सगळ्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने देशवासीयांच्या आस्था आणि संस्कृतीची थट्टा केली. श्रीराम अस्तित्वातच नव्हते, असे प्रतिज्ञापत्र काँग्रेस सरकारनेच न्यायालयात दाखल केले. पूर्वीही सोमनाथ मंदिराला भेट देऊ नका, असे पत्र तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांना पाठवले होते, अशी आठवण करून देत डॉ. सत्यपाल सिंह यांनी आता भाजपने तीर्थक्षेत्रांचा विकास घडवत देशाचा विकास घडवून आणल्याचे सांगितले.

# महिलांचा अवमान करणाऱ्या 'मविआ'च्या नेत्यांवर कारवाई करा

## केशव उपाध्ये यांची निवडणूक आयोगाकडे मागणी

**मुंबई, दि. ५ : प्रतिनिधी**

''महिलांबद्दल बेताल, अवमानकारक वक्तव्य करणाऱ्या आणि छत्रपतींच्या गादीचा कायमच अपमान करणाऱ्या काँग्रेस आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांवर निवडणूक आयोगाने कायदेशीर कारवाई करावी,'' अशी मागणी भाजपचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी मंगळवार, दि. ५ नोव्हेंबर रोजी केली.

कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसच्या अधिकृत उमेदवार मधुरिमाराजे छत्रपती यांनी उमेदवारी मागे घेतल्यानंतर काँग्रेसचे आमदार व माजी मंत्री सतेज पाटील यांनी त्यांना उद्देशून काढलेल्या उद्गारातून काँग्रेस नेत्यांची बोलण्याची, विचार करण्याची विकृत मानसिकता दिसून येते. छिंदवाडा येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा हटवण्याचे प्रकरण असो की, विशाळगडावरील अतिक्रमण हटवण्याची घटना, काँग्रेसने कायम छत्रपतींच्या गादीचा अपमान करण्याचेच काम केल्याची टीका उपाध्ये यांनी केली.

''उबाठाचे संजय राऊत यांनी काही दिवसांपूर्वी छत्रपतींच्या गादीचा वारस असण्याबद्दल पुरावा मागत राज्यातील तमाम शिवप्रेमी जनतेच्या भावना दुखावल्या होत्या. अरविंद सावंत यांनीही शायना एन.सी. यांच्याबद्दल अनुद्गार काढल्याने केवळ महिलांचीच नव्हे, तर समस्त जनतेची मान खाली गेली आहे. एकीकडे महिला अत्याचाराबद्दल आवाज उठवायचा, दुसरीकडे असे वागायचे, या सगळ्यातून काँग्रेसचा दुटप्पीपणा दिसतो. त्यामुळे महाविकास आघाडीच्या या नेत्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई व्हावी,'' अशी मागणी निवडणूक आयोगाकडे करत असल्याचे उपाध्ये यांनी यावेळी सांगितले.

# अशी भाषा वापरण्याची हिंमत होतेच कशी?

## आ. चित्रा वाघ यांचा सतेज पाटील यांना सवाल

**मुंबई, दि. ५ : प्रतिनिधी**



''दम नव्हता तर' सारखी भाषा वापरण्याची हिंमत होतेच कशी?'' असा सवाल विधान परिषद आ. चित्रा वाघ यांनी काँग्रेस नेत्यांना केला आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसच्या अधिकृत उमेदवार आणि खा. शाहू महाराज यांच्या सूनबाई मधुरिमाराजे यांनी अर्ज मागे घेतला. त्यामुळे काँग्रेस नेते सतेज पाटील चांगलेच संतापले आणि 'दम नव्हता तर उभे राहायचे नव्हते', अशा शब्दात त्यांनी आपला संताप व्यक्त केला. यावर आता आ. चित्रा वाघ यांनी काँग्रेसवर निशाणा साधला.

आ. चित्रा वाघ म्हणाल्या की, ''लाडकी बहीण योजना' लागू झाल्यापासून विरोधकांमध्ये जणू महिलांचा अपमान करण्याची स्पर्धा लागली आहे. आमच्या भगिनी शायना एन.सी. असो किंवा कोल्हापुरात आज छत्रपती घराण्यातील सून असो, 'दम नव्हता तर' सारखी भाषा वापरण्याची हिंमत होते तरी कशी? महिलांना कमी लेखणाऱ्या या प्रवृत्तीचा तीव्र निषेध. काँग्रेस नेत्यांना माझी विनंती आहे, महिलांच्या अपमानाचे हे सत्र तात्काळ थांबवा,'' असे त्या म्हणाल्या.

### सतेज पाटील काय म्हणाले?



''माझी पूर्णपणे फसवणूक केली. मला तोंडघशी का पाडलंत? आधीच निर्णय घ्यायचा होता. दम नव्हता तर उभं राहयचं नव्हतं. मी पण माझी ताकद दाखवली असती,'' अशा शब्दात सतेज पाटील यांनी मधुरिमाराजेंनी अर्ज मागे घेतल्यानंतर आपला संताप व्यक्त केला. त्यानंतर त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांना अश्रू अनावर झाल्याचं पाहायला मिळालं.

# दादर रेल्वेस्थानकातील असुविधांकडे मुंबई भाजपने वेधले रेल्वेमंत्र्यांचे लक्ष



**मुंबई, दि. ५ : प्रतिनिधी**

मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या दादर रेल्वे परिसरातील अस्वच्छता, फेरीवाल्यांचा विळखा आणि टॅक्सीवाल्यांच्या मनमानीकडे मुंबई भाजपने रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे लक्ष वेधले आहे. यासंदर्भातील निवेदन रेल्वेमंत्र्यांना सादर करीत समस्यांचे निराकरण करण्याची विनंती भाजपने रेल्वेमंत्र्यांना केली आहे.

दादर हे मध्यवर्ती ठिकाण असल्यामुळे दररोज मध्य आणि पश्चिम रेल्वेस्थानकावरून लाखो प्रवासी प्रवास करतात. सर्वसामान्य मुंबईकरांसह बाहेरून येणाऱ्या प्रवाशांना या गर्दीचा त्रास सहन करावा लागतो. दादर पूर्व आणि पश्चिमेकडील अनधिकृत फेरीवाल्यांमुळे रेल्वेस्थानकात ये-जा करताना प्रवाशांना तारेवरची कसरत करावी लागते. त्याशिवाय फेरीवाल्यांमुळे अस्वच्छता ही गंभीर समस्या निर्माण झाली आहे. 'स्वच्छ भारत' या संकल्पनेसाठी हे साजेसे चित्र नाही.

टॅक्सीवाल्यांच्या मनमानीमुळे प्रवाशांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. जवळचे भाडे नाकारण्याचे प्रकार वाढले आहेत. शिवाय स्थानक परिसरात बेकायदेशीररित्या गाड्या उभ्या करून ठेवल्या जात असल्यामुळे वाहतुककोंडीचा सामना करावा लागतो. त्यामुळे रेल्वे प्रशासन, मुंबई पालिका आणि वाहतूक विभागाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेऊन या समस्यांचे निराकरण करावे, अशी विनंती मुंबई भाजपच्या वतीने करण्यात आली आहे.

# सुनील राऊतांची उमेदवारी रद्द करा

## निवडणूक आयोगाकडे शीतल म्हात्रे यांची मागणी

**मुंबई, दि. ५ : प्रतिनिधी**

''विक्रोळी मतदारसंघातील उबाठा गटाचे आ. सुनील राऊत यांची उमेदवारी रद्द करावी,'' अशी मागणी शिवसेना प्रवक्त्या शीतल म्हात्रे यांनी मंगळवार, दि. ५ नोव्हेंबर रोजी केली. बाळासाहेब भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. ''सुनील राऊत शिवसेना उमेदवार सुवर्णा करंजे यांची कत्तल करायला कसाई पाठवणार असून, निवडणूक आयोगाने रक्षण करावे,'' असे म्हात्रे यांनी म्हटले.

''सुनील राऊत याने प्रचारादरम्यान सुवर्णा करंजे यांचा बकरी असा उल्लेख केला होता. येत्या दि. २० नोव्हेंबर रोजी बकरीला कापून टाकणार, असे वक्तव्य राऊत याने केले होते. तुमच्यामध्ये आल्यावर मला बरे वाटते, असेही सुनील राऊत याने मुस्लीम मतदारांच्या सभेत म्हटले होते. यावर शिवसेना महिला आघाडीने सुनील राऊत याच्या वक्तव्यावर टीका केली असून त्याची उमेदवारी रद्द करावी,'' अशी मागणी शीतल म्हात्रे यांनी केली आहे.

''तुम्ही एका हिंदू महिलेला कापून टाकू बोलतात. धमकी देता, कोणत्या धर्मातील मतदारांना खुश करायला तुम्ही हे बोलताय,'' असा सवाल म्हात्रे यांनी केला. त्यापुढे म्हणाल्या की, ''महिलांचा वारंवार अपमान करणे, त्यांना धमक्या



देणे, शिवीगाळ करणे हेच उबाठाचे धोरण आहे का, उद्धव ठाकरे आणि रश्मी ठाकरे यांनी यावर भूमिका स्पष्ट करावी. संजय राऊत यांनी इतर विषयांवर बोलण्यापेक्षा आधी सुनील राऊतबाबत बोलावे,'' असे आव्हान म्हात्रे यांनी दिले. दरम्यान, सुनील राऊत याच्यावर भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५६ (२), ३५१ (२) नुसार गुन्हा दाखल झाला आहे.

''खा. अरविंद सावंत हे शायना एन.सी. यांना इम्पोर्टेड माल म्हणाले की, आता सुनील राऊत महिलेला बकरी म्हणाले. यापूर्वी संजय राऊत हे स्वप्ना पाटकर या महिलेला शिवीगाळ करतात, हे पाहता उबाठाचा महिलांबाबत खरा चेहरा पुढे आला आहे. महिलांना तुच्छतेची वागणूक देणारे, तिचे खच्चीकरण करणाऱ्या उबाठा उमेदवारांना राज्यातील महिला या निवडणुकीत नक्कीच गाडून टाकतील,'' असा विश्वास म्हात्रे यांनी व्यक्त केला.

### सुनील राऊत हा मनोरुग्ण

''सुनील राऊत हा मनोरुग्ण असून, लोकप्रतिनिधी म्हणण्याच्याही लायकीचा नाही,'' अशी टीका सुवर्णा करंजे यांनी केली. त्या पुढे म्हणाल्या की, ''विक्रोळीत सुनील राऊत विरोधात सर्वसामान्यांमध्ये प्रचंड चीड आहे. मी तीनवेळा नगरसेवक म्हणून जे काम केले आहे, त्याच्या एक टक्काही काम सुनील राऊत याने केलेले नाही. त्याने समोरासमोर चर्चा करावी,'' असे आव्हान करंजे यांनी दिले. ''प्रत्येक महिलेसोबत सुनील राऊत उद्धट आणि उर्मटपणे वागतो. यापूर्वी एका सभेत राऊतने माझा कैकयी म्हणून उल्लेख केला होता. उबाठा गट सोडून मी मूळ शिवसेनेत आले, तेव्हा सुनील राऊतने कचरा गेला, असे म्हटले होते. मात्र, हाच कचरा डोळ्यात गेल्यावर कसा डोळ्याची वाट लावतो, हे त्याला लवकरच कळेल,'' असा इशारा करंजे यांनी यावेळी दिला.

''मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजने'ने विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली असून, आता त्यांच्याकडून महिलांचा वारंवार अपमान करण्याचे प्रयत्न केले जात आहेत,'' असेही त्या म्हणाल्या.

# संजय वर्मा यांची राज्याच्या पोलीस महासंचालकपदी नियुक्ती

**मुंबई, दि. ५ : प्रतिनिधी**



राज्याच्या पोलीस महासंचालकपदी संजय वर्मा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सोमवार, दि. ४ नोव्हेंबर रोजी केंद्रीय निवडणूक आयोगाने रश्मी शुक्ला यांची बदली करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर या पदावर कोणाची नियुक्ती होणार? अशी चर्चा सुरू असताना आता संजय वर्मा यांची वर्णी लागली आहे.

रश्मी शुक्ला यांच्या बदलीनंतर या पदासाठी तीन नावांचा अहवाल केंद्रीय निवडणूक आयोगाकडे सोपवण्यात येणार होता. यात विवेक फणसळकर, संजय वर्मा आणि रितेश कुमार या नावांचा समावेश होता. दरम्यान, संजय वर्मा यांच्यावर राज्याच्या पोलीस महासंचालकपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. संजय वर्मा यांच्यावर सध्या राज्याच्या कायदा आणि तंत्रज्ञान विभागाची जबाबदारी आहे.

**पाहिजेत**

सांस्कृतिक वार्तापत्र या नामांकीत पाक्षिकात खालील पदांसाठी व्यक्ती नेमणे आहे.

| पद | पात्रता | निवास |
|---|---|---|
| १. कोकण प्रांत विक्री अधिकारी | १. कोणत्याही शाखेचा पदवीधर<br>२. कोकणात प्रवासाची तयारी<br>३. हिंदुत्वाची जाण<br>४. मार्केटिंग चा २/३ वर्षांचा अनुभव<br>५. वयोमर्यादा ४० वर्षे आतील | मुंबई अथवा कोकण चालेल |

आकर्षक पगार व आनंदी वातावरण असलेल्या कार्यालयात हिंदुत्वाची जाण असणारे कर्मचारी हवे आहेत. इच्छुकांनी खालील ठिकाणी संपर्क करावा.

**सांस्कृतिक वार्तापत्र कार्यालय**

C-१०१, शालिनी रेसिडेन्सी, श्रीराम चौक, कर्वेनगर, पुणे-५२

फोन :- ९६०४९३७१५/८८०६३७४७५८

# 'समरसता साहित्य परिषदे'तर्फे 'राज्यस्तरीय खुली लेखन स्पर्धा'

**मुंबई, दि. ५ : प्रतिनिधी**



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दीनिमित्त 'समरसता साहित्य परिषद', महाराष्ट्रतर्फे 'राज्यस्तरीय खुली लेखन स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे. ''पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचे धार्मिक सामाजिक आणि राजकीय नेतृत्व कालातीत आहे. त्यांच्या जन्म त्रिशताब्दीनिमित्त परिषदेतर्फे राज्यस्तरीय खुली लेख स्पर्धा आयोजित करण्यास आम्हाला आनंद होत आहे,'' असे मत समरसता परिषदेचे कार्याध्यक्ष प्रसन्न पाटील यांनी व्यक्त केले.

लेख मराठी भाषेतूनच असावा. तसेच लेखाची शब्द मर्यादा ८०० ते १००० शब्द असावी. लेख पूर्ण टाईप करून त्यावर आपले नाव, मोबाईल नंबर, ईमेल आयडी आणि जिल्हा लिहून samarasatamah@gmail.com या ईमेलवर दि. १० जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ५ पर्यंत पाठवावा, असे आयोजकांनी नमूद केले आहे.

ही स्पर्धा प्रथम जिल्हा स्तरावर आयोजित करण्यात येत असून त्यातून प्रथम, द्वितीय, तृतीय आणि उत्तेजनार्थ विजेते निवडण्यात येतील. पुढे जिल्हास्तरीय विजेत्या स्पर्धकांमधून राज्यस्तरीय विजेते निवडले जाणार आहेत.

राज्य पातळीवर पारितोषिक रक्कम ही प्रथमसाठी ७ हजार, ००१, द्वितीयसाठी ५ हजार, ००१, तृतीयसाठी ३ हजार, ००१ आणि उत्तेजनार्थ (५ जण) एक हजार, ००१ अशी आहे. तसेच जिल्हा पातळीवर प्रथमसाठी २ हजार, ००१, द्वितीयसाठी १ हजार, ५०१, तृतीयसाठी एक हजार, ००१ आणि उत्तेजनार्थ (५ जण) ५०१ रुपये असे आहेत. स्पर्धेसंबंधी अधिक माहितीसाठी समरसता साहित्य परिषदेच्या https://www.facebook.com/samarasatasp?mibextid=LQQJ4d या फेसबुक पेज बुकवर माहिती मिळेल, असे आयोजकांनी सांगितले आहे.

### स्पर्धेसाठी विषय आहेत

- अहिल्यादेवी-न्यायप्रिय, आदर्श प्रशासक व समाज सुधारक
- अहिल्यादेवींचे धर्मकार्य व राष्ट्रीय दृष्टिकोन
- अहिल्यादेवी होळकर-भारतीय स्त्री चिंतनाच्या आदर्श
- अहिल्यादेवींचे जीवनकार्य-आजच्या युगातील प्रासंगिकता.
- अहिल्यादेवी आणि पारंपरिक स्थापत्य आणि कला विकास

**This may be published in Newspapers and TV from the day following the last date for withdrawal of candidature and upto two days before the date of poll**

**Format CI-**
**(for candidate to publish in Newspapers, Tv')**

**Declaration about criminal cases**

(As per the judgment dated 25th September, 2018, of lion'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India &Anr.)

**Name and address of candidate:** Mangal Prabhat Lodha, resident of 12 Anupam, 11 Manav Mandir Road, Mumbai 400 006

**Name of political party: Bharatiya Janata Party (Independent candidates should write "Independent" here)**

**Name of Election:** Maharashtra Legislative Assembly - 2024

***Name of Constituency: 185 Malabar Hill Assembly Constituency**

**I, MangalPrabhat Lodha, a candidate for the Maharashtra Legislative Assembly - 2024 abovementioned election, declare for public information the following details about my criminal antecedents**

**(A)Pending criminal cases**

| SI No | Name of Court | Case No.and dated | Status of case(s) | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| 1 | Metropolitan Magistrate, 40th Court at Girgaum Court. | Case No.440/PS/2024<br>Next Date: 18.11.2024 | For statement under Sec.313 of CRPC | Section 174 (a) and 147 of Railways Act, 1989.<br>Alleged Political Demonstration, by stopping running of train |
| 2 | Bombay City Civil and Sessions Court, 54th Court at Mumbai | Sessions Case No.256 of 2021,<br>Next Date: 10.12.2024 | For Cross Examination of PW1. | IPC 353, 332,341,143,147,149,188,269, 427, 504 a/w MPA 37,135, & PDPA 3, 4.<br>Political motivated case against BEST escalated Bills during Lockdown. |

**(B)Details about cases of conviction for criminal offences**

| SI No | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
|---|---|---|---|
| NA | NA | NA | NA |

*In the case of election to Council of States or election to Legislative Council by MLAs, mention the election concerned in place of name of constituency